जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यास मान्यता.

## महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

## शासन निर्णय क्रमांकः क्रीडाधो-३११३/प्र.क्र.५५/क्रीयुसे-३,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

तारीख: २२ मे, २०१४.

**वाचा -**

१. समाज कल्याण, सांस्कृतीक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग शासन निर्णय, क्रमांक- पीएचई-१०८९/प्र.क्र.३२९/क्रीयुसे-१, दि.११ फेब्रुवारी, १९९३.

२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय, क्रमांक क्रीडाधो/प्र.क्र. ५५/११/ क्रीयुसे-१, दि.१४ जून, २०१२.

**प्रस्तावना -**

राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी पोषक वातावरण असणे आवश्यक आहे. हे जाणून क्रीडा धोरण जाहीर करणारे, महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. खेळाच्या पुरेशा सुविधा निर्माण करण्यासाठी राज्याने पुढाकार घेतलेला आहे. राज्य क्रीडा क्षेत्रात अग्रगण्य रहावे, नागरिकांमध्ये व्यायामाचे आवड जोपासावी, राज्यातील खेळाडूंनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार कामगिरी करण्यासाठी क्रीडा विषयक तंत्रशुध्द प्रशिक्षण, खेळाच्या दर्जात सुधारणा, खेळाडूंना गौरव, दर्जेदार क्रीडा सुविधा या बाबी केंद्रबिंदू मानून खेळाडूंसाठी हितावह योजना राज्यात राबविण्यासाठी क्रीडा धोरण २०१२ तयार करण्यात आलेले आहे. त्याची अंमलबजावणी करण्याबाबत दिनांक १४.६.२०१२ चा शासन निर्णय निर्गमित झाला आहे त्यातील शिफारशीच्या अनुषंगाने राज्यातील क्रीडापटूंच्या गुणांना वाव मिळण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात प्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याची बाब शासनाचे विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

ग्रामीण व शहरी भागातील उदयोन्मुख खेळाडूंना अद्यावत कौशल्याचे प्रशिक्षण देण्यासाठी जिल्हयाच्या ठिकाणी जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करून या केंद्रांना नियमित स्वरूपात आर्थिक

सहाय्य उपलब्ध करून देण्याबाबतचा दि.११.०२.१९९३ चा शासन निर्णय अधिक्रमीत करण्यात येत असून सदर योजना क्रीडा धोरण २०१२ नुसार सुधारित स्वरुपात राबविण्यास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

१. **योजनेचे नाव :-** ह्या योजनेस " जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रास मंजूर करण्यात येणाऱ्या अनुदानाची योजना " असे संबोधण्यात यावे.

२. **योजनेचे स्वरूप :-** राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्राची स्थापना करून या केंद्राचे ठिकाणी क्रीडा प्रशिक्षणाच्या अद्यावत सुविधा उपलब्ध करून घेवून या सुविधांच्या माध्यमातून जिल्ह्यातील खेळाडूंना नियमित स्वरूपात क्रीडा प्रशिक्षण देण्यात येईल.

३. **अनुदानास पात्र केंद्र:-** राज्यातील ज्या जिल्ह्यात जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन होण्यास शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे असे केंद्र अनुदानास पात्र समजण्यात यावे.

४. **अनुदानासाठी ग्राह्य बाबी :-** सदर योजनेंतर्गत अनुदानकरीता खालील बाबी ग्राह्य धरण्यात याव्यात:-

१. क्रीडा साहित्य व क्रीडा प्रशिक्षण उपक्रम.
२. अंशकालिन मैदानसेवकाचे मानधन.
३. क्रीडा विषयक वाङ्:मय, सी.डी. पुस्तके, नियतकालिके, मासिके इ.
४. कार्यालयीन / सादिल खर्च.
५. अशासकीय प्रशिक्षकास मानधन व प्रवास खर्च.
६. क्रीडा मार्गदर्शकाचे गणवेश.
७. क्रीडा मार्गदर्शकासाठी प्रवास खर्च
८. क्रीडा प्रशिक्षण शिबीराचा खर्च.

५. **अनुदानाची मर्यादा :-** खाली नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक प्रशिक्षण केंद्रास अनुदान मंजूर करण्यात येईल:-

| अ. क्र. | बाब | अनुदान रक्कम |
|---|---|---|
| १ | क्रीडा साहित्य व क्रीडा प्रशिक्षण उपकरणे ( ५ क्रीडा मार्गदर्शकांना प्रत्येकी रू.५०,०००/- प्रमाणे ) | रु.२,५०,०००/- |
| २ | ५ क्रीडा मार्गदर्शकांचे केंद्रावर नियमित सराव करणाऱ्या प्रत्येकी ५० खेळाडूंना ट्रॅकसुट, टी-शर्ट, शॉर्टस्, शुज इ.(५५x रू.१,५००/-) | रू.४,१२,५००/- |
| ३ | ३ अंशकालिन मैदानसेवकांचे मानधन (रू.६,०००/- प्रमाणे ६०००x१२x३) | रु.२,१६,०००/- |

| अ. क्र. | बाब | अनुदान रक्कम |
|---|---|---|
| ४ | क्रीडा विषयक वाङ्:मय, सी.डी. पुस्तके, नियतकालिके, मासिके इ. | रु. २५,०००/- |
| ५ | कार्यालयीन / सादिल खर्च | रु. ४०,०००/- |
| ६ | अशासकीय प्रशिक्षकास मानधन, ५ खेळांसाठी १० प्रशिक्षक दोन महिने (रू.१०,००० X १० X २) | रू.२,००,०००/- |
| ७ | प्रशिक्षकाचा प्रवास खर्च | रू.३०,०००/- |
| ८ | क्रीडांगण देखभाल व दुरूस्ती | रू.७५,०००/- |
| ९ | चर्चासत्र / परिसंवाद / उजळणी वर्ग (वर्षातून किमान दोन वेळा) | रू.६०,०००/- |
| १० | समुपदेशन (कॉन्सिलिंग) | रू.३०,०००/- |
| ११ | प्रशिक्षण केंद्राच्या प्रसिध्दीसाठी ब्रोशर तयार करणे, प्लेक्स बोर्ड, पोस्टर्स, स्थानिक वृत्तपत्र / केबल वाहिनी. | रू.१०,०००/- |
| १२ | प्रशिक्षण शिबिर वर्षातून २ वेळेस (१०० खेळाडू १० दिवस, रू. ५० प्रती अल्पोपहार) (रू.५०x१००x२x१०) | रू. १,००,०००/- |
| | **एकूण** | रू.१४,४८,५००/- |

**रू.१४,४८,५००/- प्रतिजिल्हा x ३५ जिल्हे = रू.५,०६,९७,५००/- एकूण राज्यस्तरीय खर्च.**

६) **<u>अनुदान मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करण्याची पध्दत :-</u>** मान्यता प्राप्त जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र अनुदान मंजूरीसाठी सविस्तर प्रस्ताव खालील आवश्यक त्या कागदपत्रांसह संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा क्रीडा परिषद यांनी आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

१. क्रीडा प्रशिक्षण केंद्राद्वारे तालुक्यात राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाचा सविस्तर अहवाल. (गतवर्षी आयोजित झालेल्या प्रकल्पांचे अहवाल, छायाचित्रे, वृत्तपत्र कात्रणे इ. तपशीलासह)

२. गतवर्षी दिलेल्या अनुदानाचे विनियोग प्रमाणपत्र व परिक्षित लेखाविवरणपत्र.

३. केंद्रात अस्तित्वात असलेले क्रीडा साहित्य व क्रीडा प्रशिक्षण उपकरणे, फर्निचर इ. साहित्याची यादी व सद्य:स्थिती बाबत अभिप्राय.

४. क्रीडा प्रशिक्षण केंद्र आवश्यक असलेले नवीन क्रीडा साहित्य व उपकरणे, फर्निचर, क्रीडा वाङ्:मय, नियतकालिके, सी.डी. पुस्तके इ. ची किंमतीसह यादी.

५. क्रीडा प्रशिक्षण केंद्रात नेमण्यात येणारे अंशकालीन प्रशिक्षक व मैदानसेवक यांची नांवे व देण्यात येणा-या मानधनाचा तपशिल.

६. प्रशिक्षण केंद्रात नियमित उपस्थित राहणाऱ्या खेळाडूंची यादी.

७. चालु वर्षात प्रशिक्षण केंद्रात राबवावयाच्या योजनांचा प्रकल्प अहवाल.

**७) अनुदान मंजूरीच्या अटी :-** जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडून जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्राच्या अनुदान मंजूरीसाठी संचालनालयास प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत खालील अटीनुसार करण्यात यावी.

१. अनुदान मंजूरीसाठी जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रास शासनाची मान्यता आवश्यक आहे.

२. नियम क्र.६ मध्ये नमूद करण्यात आलेली सर्व कागदपत्रे प्रस्तावासोबत जोडलेली असावीत.

३. जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रास पूर्वी दिलेल्या अनुदानातून खरेदी केलेले साहित्य सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध असल्याबाबत खात्री करावी.

४. केंद्रात उपलब्ध असलेल्या साहित्याचा योग्य प्रकारे उपयोग करण्यात येत असल्याबाबत जिल्हा क्रीडा अधिकारी यांचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

५. प्रशिक्षण केंद्रात उपलब्ध असलेले क्रीडा साहित्य, प्रशिक्षण उपकरणे, क्रीडा वाङ्:मये, नियतकालिके, फनिर्चर विचारात घेऊन प्रशिक्षण केंद्रास नवीन साहित्याची आवश्यकता असल्याबाबतची खात्री करावी व त्यानुसार अनुदान मंजूर करावे, पंरतु नियम क्र.५ मध्ये दर्शविलेल्या एकूण अनुदानाच्या मर्यादेपेक्षा जास्त नसावे. तथापि एका मान्य बाबींवरील शिल्लक दुस-या मान्य बाबीवर मंजूर करण्याचे अधिकार संचालक, क्रीडा व युवक सेवा यांना आहे.

**८) अनुदान मंजूरीचे प्राधिकारी :-** उपरोक्त नियमांचे अधीन राहून तसेच या योजनेसाठी पुरेशी आर्थिक तरतूद उपलब्ध असल्याची खात्री करून अनुदान मंजूरीसाठी आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**९) आहरण व संवितरण अधिकारी:-** आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांनी मंजूर केलेल्या अनुदानासाठी संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी सदर अनुदान आहरित करून विहित शासकीय प्रणाली / नियम अनुसरून खर्च करण्याची दक्षता घ्यावी.

१०) **<u>नियंत्रण अधिकारी :-</u>** आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना नियंत्रण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

११) **<u>नियम शिथिल / बदल करण्याचे अधिकार:-</u>** उपरोक्त नियमात अंशत: किंवा पूर्णत: बदल /शिथिल करण्याचे अधिकार प्रशासकीय विभागास राहतील.

जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रास आर्थिक सहाय्य करण्यासाठी येणारा खर्च हा २२०४, क्रीडा व युवक सेवा, १०४ क्रीडा व खेळ, (१०) क्रीडा प्रशिक्षण केंद्राची स्थापना (१०)(०३) जिल्हा प्रशिक्षण केंद्राची स्थापना (२२०४ ५६८२) त्या त्या आर्थिक वर्षात मंजूर केलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

हा शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचे अनौपचारिक संदर्भ क्र. अनौस २२० व्यय-५ . दिनांक ८.३.२०१३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०५२२१५४८५५३५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajshekhar Chandrakant Patil

Digitally signed by Rajshekhar Chandrakant Patil
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rajshekhar Chandrakant Patil
Date: 2014.05.22 15:52:17 +05'30'

**( रा. चं. पाटील)**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
२. मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
३. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
४. आयुक्त / संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
६. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
७. नियोजन विभाग (का.१४७१), मंत्रालय, मुंबई,
८. वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई,

९. सर्व जिल्हाधिकारी, (संचालनालयामार्फत),

१०.सर्व उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा (संचालनालयामार्फत),

११.सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत),

१२.ग्रंथपाल, विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई,

१३.मा.मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

१४.मा.राज्यमंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

१५.निवड नस्ती (क्रीयुसे-१, क्रीयुसे-२ व क्रीयुसे-३).